स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड – 431 606 (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
Nanded – 431 606, MAHARASTRA STATE, INDIA
Established on 17th September 1994 – Recognised by the UGC U/S 2(F) and 12(B), NAAC Re-accredited with Á'Grade
SCHOOL OF LANGUAGE, LITERATURE AND CULTURE STUDIES
Phone ( 02462) 229 128 Website : www.srtmun.ac.in E-mail: directorsllcs@gmail.com



दिनांक ०९/१०/२०१५

# आवाहन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञान कथा कार्यशाळा' विद्यापीठात आयोजित करण्यात येत आहे.ही कार्यशाळा डिसेंबर २०१५ अथवा जानेवारी २०१६ मध्ये घेण्यात येईल. 'नव्या पिढीतील लेखक तयार करणे ही साहित्याची गरज आहे' अशा उद्देशातून ही कार्यशाळा आयोजित करण्यात येत असून त्यासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही. कार्यशाळेचा कालावधी तीन दिवसांचा राहील. विज्ञान, कला, अभियांत्रिकी, वैद्यकीय शाखांतील पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि होतकरू लेखक कार्यशाळेत सहभागी होऊ शकतात.

ही कार्यशाळा मराठवाड्यातील तथापि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि या विद्यापीठ परिक्षेत्रांतील सलंग्नीत महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी आहे. या विज्ञान कथा कार्यशाळेत कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, निरंजन घाटे, सुबोध जावडेकर, डॉ. बाळ फोंडके, अ. पां. देशपांडे, डॉ. संजय ढोले, रेखा बैजल आदी नामवंत विज्ञान लेखक मार्गदर्शन करणार आहेत. या मार्गदर्शनाचा नवोदित तसेच होतकरू लेखकांना सर्जनशील निर्मितीसाठी निश्चितच उपयोग होणार आहे.

कार्यशाळेसंबधीची अधिक माहिती याप्रमाणे :

१) कार्यशाळेत २५ विद्यार्थ्यांचा सहभाग असेल आणि त्यात नांदेडबाहेरील १४ विद्यार्थी राहतील. नांदेडबाहेरील १४ विद्यार्थ्यांची निवासव्यवस्था विद्यापीठामार्फत करण्यात येईल.

२) नांव नोंदणीसाठी सहभागी विद्यार्थ्यांनी 'मराठी विज्ञान साहित्य' या विषयावर फुलस्केप दोनपानी निबंध लिहून पाठविणे अनिवार्य आहे. निबंध खालील पत्त्यावर दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ पर्यंत टपालसेवा अथवा खाली दर्शविलेल्या ई—मेलवर पाठवायचा आहे.

पान...२...पहा

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड – 431 606 (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY**

Nanded – 431 606, MAHARASTRA STATE, INDIA



Established on 17th September 1994 – Recognised by the UGC U/S 2(F) and 12(B), NAAC Re-accredited with Á'Grade

## SCHOOL OF LANGUAGE, LITERATURE AND CULTURE STUDIES

Phone ( 02462) 229 128 Website : www.srtmun.ac.in E-mail: directorsllcs@gmail.com

---



३) कार्यशाळेतील सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतील. सहभागी २५ विद्यार्थ्यांची भोजनव्यवस्था विद्यापीठामार्फत करण्यात येईल.

४) ही कार्यशाळा विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये होईल, तसे निवड झालेल्या २५ विद्यार्थ्यांना कळविण्यात येईल.

५) कार्यशाळा आयोजन, नियोजनासंबंधीचा समितीचा निर्णय अंतिम राहील.

६) इच्छूक विद्यार्थी व होतकरू लेखक यांनी आपल्या संपूर्ण अचूक पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक आणि ई–मेलसह नांवनोंदणी करणे अनिवार्य आहे.

**नांवनोंदणी करण्याचा अंतिम दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ असून अधिक संपर्कासाठी:**

डॉ. केशव सखाराम देशमुख भ्रमणभाष : ९४२२७२१६३१
ई–मेल : keshavdeshmukh74@gmail.com

डॉ. रमेश ढगे भ्रमणभाष : ९०११२५७९३६.
ई–मेल : dhageramesh@gmail.com

डॉ. शिवाजी चव्हाण भ्रमणभाष : ९४२१०४६३७२.
ई–मेल : dr.spchavan@rediffimail.com

<u>पत्रव्यवहार आणि संपर्कासाठी पत्ता</u>

.

**डॉ. केशव सखाराम देशमुख,**
मराठी विभागप्रमुख,
भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल,स्वा.रा.रा.ती.म.
विद्यापीठ, नांदेड – ४३१ ६०६

**डॉ. रमेश ढगे,**
संचालक,
भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल, स्वा.रा.रा.ती.म.
विद्यापीठ, नांदेड– ४३१ ६०६

---